# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि ११/०१/२०२४

## कार्यवृत्त

आज दि ११/०१/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, शिक्षण, आरोग्य, नियोजन व पाणी पुरवठा विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | नगरपरिषद निधी अंतर्गत मलकापूर न.प. हद्दीत नमूद केलेल्या विकास कामांना मंजुरी देणे बाबत. |
| २ | मलकापूर नगर परिषद हद्दीतील यशवंत नगर भागातील करावयाच्या विकास कामांना मंजुरात देणे बाबत. |
| | शिक्षण विभाग |
| ३ | म्यु. जू. कॉलेज मधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यास मान्यता देणे बाबत. |
| ४ | म्यु. हायस्कूल मधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यास मान्यता देणे बाबत. |
| | आरोग्य विभाग |
| ५ | न.प. मलकापूर चे शहर समन्वयक श्री अभिषेक अनंत सोनोने यांना मुदत वाढ आदेश देणे बाबत. |
| | नियोजन विभाग |
| ६ | मलकापूर न.प. हद्दीतील धारिवाल टाउनशिप मधील खुली जागा (Open Space) हि साई झुलेलाल ट्रस्ट यांना सामाजिक कार्यासाठी वापरायला देण्यास मान्यता देणे बाबत. |
| ७ | महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ गुंठेवारी अंतर्गत भूखंड नियमितीकरण करताना भूखंड धारकांकडून आकारण्यात येणाऱ्या प्रशमन शुल्क व विकास शुल्का बाबत. |
| | आस्थापना विभाग |
| ८ | मलकापूर न.प. कर्मचारी शे. अफजल शे. रसूल शाळा चपराशी यांनी स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबत दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे. |
| | पाणी पुरवठा विभाग |
| ९ | जलशुद्धीकरण केंद्रावरील प्लॉट क्र. २ क्लॅरिफायरच्या ब्रिजवरील तसेच फ्लॅश मिक्सर वरील गिअर बॉक्स बसविणे व इतर किरकोळ कामे करणे बाबत. |
| १० | न.प. मलकापूर पाणीपुरवठा विभाग करिता सन २०२४-२५ वर्षासाठी नमूद केलेल्या कामांकरिता मक्तेदारांची नेमणूक करणे बाबत. |

**विषय क्र १:- नगरपरिषद निधी अंतर्गत मलकापूर न.प. हद्दीत नमूद केलेल्या विकास कामांना मंजुरी देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. श्री राजेश पंडितराव एकडे विधानसभा सदस्य, मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र.२१-मविस/M/८५२/२०२३ दि. २२/११/२०२३ नुसार न.प. निधी अंतर्गत मलकापूर नगर परिषद हद्दीतील खालील कामे मंजूर करणे बाबत कळविले आहे.

१) मौलाना अब्दुल कलाम आझाद शाळेतील काँक्रीट नालीचे बांधकाम करणे.

२) युनुस शेख यांच्या घरापासून ते वसंत निळे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २ :- मलकापूर नगर परिषद हद्दीतील यशवंत नगर भागातील करावयाच्या विकास कामांना मंजुरात देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग व मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. चैनसुख संचेती, उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश यांचे पत्र क्र. मंत्री/सहकार/व्हीआयपी/०८/२०२४ दि. ०३/०१/२०२४ अन्वये न.प. हद्दीतील खालील कामे जिल्हा नियोजन विभागांतर्गत मंजूर करणे बाबत मा. नामदार श्री दिलीपजी वळसे पाटील, पालकमंत्री तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन विकास समिती, बुलढाणा जिल्हा यांना पत्राद्वारे कळविले असून त्यानुसार आवश्यक कारवाई करणे बाबत म्हटले आहे. ती कामे खालील प्रमाणे.

१) न.प. मलकापूर अंतर्गत पुरोहित कॉलनी ते अशोक नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

२) न.प. मलकापूर अंतर्गत यशवंतनगर येथे अवि जगदाळे यांचे घर ते रुपेश जगताप यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

३) न.प. मलकापूर अंतर्गत यशवंतनगर येथे भागवत बोबडे ते विष्णू कदम यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

४) न.प. मलकापूर अंतर्गत यशवंतनगर येथे गणेश ठोंबरे ते राजू फणेकर यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे.

५) न.प. मलकापूर अंतर्गत यशवंतनगर येथे बाबू चव्हाण ते गणेश ठोंबरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे.

६) न.प. मलकापूर अंतर्गत यशवंतनगर येथे यमाई मंदिर ते महेश ठोंग यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

ठरविण्यात येते की, उपरोक्त नमूद कामे महत्त्वाची असल्याकारणाने सदर कामे नगरोत्थान / नागरी दलीतेत्तर अथवा इतर कोणत्याही जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ३:- म्यु. ज्यू. कॉलेज मधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यास मान्यता देणे बाबत.**

म्यु. ज्यू. कॉलेजमधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता देणेबाबत प्र. प्रशासन अधिकारी, मुख्याध्यापक मु. हायस्कूल व लेखा परीक्षक यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, न.प. अधिनस्त म्यु. ज्यु. कॉलेजमधील कार्यरत खालील शिक्षकांना सलग सेवा ही १२ वर्षे पूर्ण झाल्याने त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय आहे. सदर वेतन श्रेणी प्राप्त करण्यासाठी त्यांनी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले असून त्यांना तसे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. सदर शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. बुलढाणा यांचे मार्फत मा. वरिष्ठ लेखा अधिकारी बुलढाणा यांची मंजुरात घेण्यासाठी न.प.च्या ठरावाची आवश्यकता असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार मु. ज्यु. कॉलेजमध्ये सलग १२ वर्षे कार्यकाळ पूर्ण झालेले शिक्षक हे खालील प्रमाणे.

१)श्री प्रवीण रमेश केला (जु. कॉलेज शिक्षक) - नियुक्ती दि २५/०७/२००६ पासून कायम स्वरूपी.

२)श्री गणेश यशवंत शेळके (जु. कॉलेज शिक्षक) - नियुक्ती दि २५/०७/२००६ पासून कायम स्वरूपी.

३)श्री बाळकृष्ण उत्तमराव कुरंगळ (जु. कॉलेज शिक्षक) - नियुक्ती दि ०१/०७/२०१० पासून कायम स्वरूपी.

वरील सर्व बाबींचा विचार करता वर नमूद केलेल्या मु. ज्यु. कॉलेज मलकापूर मधील शिक्षकांना १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याच्या कारवाईस ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र ४:- म्यु. हायस्कूल मधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यास मान्यता देणे बाबत.**

म्यु. हायस्कूल मधील १२ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यास मान्यता देणे बाबत प्र. प्रशासन अधिकारी, मुख्याध्यापक मु. हायस्कूल व लेखा परीक्षक यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, न.प. अधिनस्त म्यु. हायस्कूल मधील कार्यरत खालील शिक्षकांना सलग सेवा ही १२ वर्षे पूर्ण झाल्याने त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय आहे. सदर वेतन श्रेणी प्राप्त करण्यासाठी त्यांनी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले असून त्यांना तसे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. सदर शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. बुलढाणा यांचे मार्फत मा. वरिष्ठ लेखा अधिकारी बुलढाणा यांची मंजुरात घेण्यासाठी न.प.च्या ठरावाची आवश्यकता असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार मु. ज्यु. कॉलेजमध्ये सलग १२ वर्षे कार्यकाळ पूर्ण झालेले शिक्षक हे खालील प्रमाणे.

१)श्री विनोद भागवत सोनवणे (स.शिक्षक) - नियुक्ती दि १२/०२/२००८ पासून कायम स्वरूपी.

२)कु. सोनिका उमाकांत देशपांडे (स.शिक्षिका) - नियुक्ती दि १२/०२/२००८ पासून कायम स्वरूपी.

वरील सर्व बाबींचा विचार करता वर नमूद केलेल्या मु. हायस्कूल मलकापूर मधील शिक्षकांना १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याच्या कारवाईस ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र ५:- न.प. मलकापूर चे शहर समन्वयक श्री अभिषेक अनंत सोनोने यांना मुदत वाढ आदेश देणे बाबत.**

नगरपरिषद मलकापूरचे शहर समन्वयक (City Co-ordinator) श्री अभिषेक अनंत सोनवणे यांचे आदेशाची मुदत दि. १२/११/२०२३ रोजी संपलेली असून सध्या न.प. मलकापूरचे स्वच्छ सर्वेक्षणाचे काम तसेच

Clean Toilet Campaigning ची कामे, ऑनलाईन माहिती भरणे तसेच आरोग्य निरीक्षक यांचा पदावर प्रभारी असल्याने त्यांना विविध योजना, मोहिम, अभियान यासाठी सहाय्य करणे इत्यादी कामे करावयाची असल्याने शहर समन्वयक यांना मुदतवाढ आदेश देणे गरजेचे आहे. तरी त्यांना दरमहा देण्यात येणारे मानधन ठोक पारीश्रमिक रक्कम दरमहा एकूण ४५०००/- रुपये याच मानधनावर त्यांना मुदतवाढ आदेश देणे गरजेचे असल्याबद्दल नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता नगरपरिषद मलकापूर मध्ये शहर समन्वयक यांची गरज असल्याकारणाने श्री अभिषेक अनंत सोनवणे यांना रु ४५०००/- दरमहा ठोक पारिश्रमिक मानधन रक्कम देण्यास व मलकापूर न.प. मध्ये शहर समन्वयक या पदाचा मुदतवाढ आदेश देण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र ६:- मलकापूर न.प. हद्दीतील धारिवाल टाउनशिप मधील खुली जागा (Open Space) हि साई झुलेलाल ट्रस्ट यांना सामाजिक कार्यासाठी वापरायला देण्यास मान्यता देणे बाबत.**

मलकापूर नगरपरिषद हद्दीतील धारीवाल टाऊनशिप मधील खुली जागा ही साई झुलेलाल ट्रस्ट यांना सामाजिक कार्यासाठी वापरायला देण्यास मान्यता देणेबाबत सहा. नगर रचनाकार यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, धारिवाल टाउनशिप मधील खुली जागा ही साई झुलेलाल ट्रस्ट यांना सामाजिक कार्यासाठी वापरायला देण्यास मान्यता देणेबाबत सहा. नगर रचनाकार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे आदेश पत्र क्र. रा.प्र.क्र.एन.ए.पी.-३४/मलकापूर/६७/२००९-२०१० दि. ३१ मार्च २०११ नुसार धारिवाल टाऊनशिप मधील २४६४ चौ. मी. जागा ही नगरपरिषद मलकापूर च्या मालकीची असून सदरची जागा ही धारिवाल टाऊनशिप मधील प्लॉट धारक यांच्या वापराकरता असून त्या अनुषंगाने सदरच्या जागेवर सामाजिक कार्यासाठी, मुलांना खेळण्यासाठी, ओपन जिम, योगा सेंटर तसेच सत्संग हॉल अशा विविध कामासाठी सदर जागेचा सदुपयोग करता येईल व या सोयींचा फायदा हा सदर प्लॉट धारकांना होणार असून इतरांना सुद्धा याचा लाभ घेता येईल. त्याचप्रमाणे सदर कामाकरिता लागणारा सर्व खर्च हा साई झुलेलाल ट्रस्ट व त्यातील सदस्य हे स्वतः करण्यास तयार असून त्यांना नगरपरिषद मलकापूर यांच्याकडून कोणत्याही निधीची मागणी नसून न.प ला कोणताही निधी द्यावा लागणार नाही. तसेच सदर जागा ही नगरपरिषद मलकापूरच्या मालकीची राहणार असल्याने सदर प्रकरणांमध्ये बांधकाम परवानगी देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता धारिवाल टाऊनशिप मधील २४६४ चौ.मी. खुली जागा न.प. च्या मालकीची राहणार असून ही जागा साई झुलेलाल ट्रस्ट यांना सामाजिक कार्यासाठी, मुलांना खेळण्यासाठी तसेच ओपन जिम, योगा सेंटर व सत्संग हॉलकरिता बांधकाम परवानगी देण्यास हरकत नसल्याने व या प्रकरणात नगर परिषद मलकापूरचा कोणताही आर्थिक सहभाग नसल्याने सदर प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ७:- महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ गुंठेवारी अंतर्गत भूखंड नियमितीकरण करताना भूखंड धारकांकडून आकारण्यात येणाऱ्या प्रशमन शुल्क व विकास शुल्का बाबत.**

मलकापूर नगर परिषद द्वारे सभा ठराव क्र ५ दिनांक ०४/०७/२०२३ रोजी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणी वाढ व नियंत्रण) (सुधारणा) प्रशासकीय सभेमध्ये मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र गुंठेवारी

विकास ( नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ चे कलम ३ चे उपकलम ३ मधील परंतुकात नमूद तरतुदीचा विचार करता शासनाने गुंठेवारी विकास नियमित करताना आकारण्यात यावयाचे प्रशमन विकास आकार यामध्ये एक सूत्रता घेण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-१०२१/प्र.क्र.४८/२०२१/नवि-३० दि १८/१०/२०२१ मधील नमूद दर हे निश्चित करण्यात आलेल आहेत.तसेच शासन निर्णय क्रमांक गुंठेवा-१०२२/व्हीआयपी/५१/प्र.क्र१५०/२०२२/नवि-३० अन्वेय प्रशमन शुल्क तसेच विकासाकर निश्चित करण्याचे अधिकार नियोजन प्राधिकरणांना देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक गुंठेवा-१०२१/प्र.क्र.४८/२०२१/नवि-३० दि १८/१०/२०२१ मध्ये नमूद शुल्क आकारणी करण्याचे ठरविले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता गुंठेवा-१०२१/प्र.क्र.४८/२०२१/नवि-३० दि १८/१०/२०२१ मध्ये नमूद शुल्क आकारणी करण्याच्या कार्यवाहीस हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ८:- मलकापूर न.प. कर्मचारी शे. अफजल शे. रसूल शाळा चपराशी यांनी स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबत दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.**

मलकापूर न.प. कर्मचारी शे. अफजल शे. रसूल शाळा चपराशी यांनी स्वेच्छा निवृत्ती मिळणे बाबत दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे बाबत व. लिपिक आस्थापना विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, श्री शे. अफजल शे. रसूल शाळा चपराशी यांनी स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. त्यानुसार श्री शे. अफजल शे. रसूल यांची नियुक्ती दि १२/०१/१९९४ रोजीची असून आजपर्यंत त्यांची सेवा ३० वर्षे झालेली आहे.

त्यांनी त्यांची प्राकृतिक आजारामुळे कार्यालयीन काम करणे अशक्य झाले असल्याने स्वेच्छा निवृत्तीची आवश्यकता आहे असे दिलेल्या अर्जात नमूद केले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६५ पोटकलम १ (अ) अन्वये कारवाई करावी लागणार असल्याचे नमूद केलेलं आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता श्री शे. अफजल शे. रसूल शाळा चपराशी यांनी स्वेच्छा निवृत्ती साठीचा अर्ज हा स्वेच्छेने केला असून त्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण नसल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम ६५ पोटकलम १ (अ) अन्वये अर्जदार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देण्यास हि सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र ९:- जलशुद्धीकरण केंद्रावरील प्लॉट क्र. २ क्लॅरिफायरच्या ब्रिजवरील तसेच फ्लॅश मिक्सर वरील गिअर बॉक्स बसविणे व इतर किरकोळ कामे करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार जलशुद्धीकरण केंद्रावरील प्लॉट क्र. २ च्या क्लॅरिफायरच्या ब्रिजवरील तसेच फ्लॅश मिक्सरवरील गिअर बॉक्स नसल्यामुळे क्लॅरिफायर चा ब्रिज बंद असून क्लॅरिफायरच्या तळाशी मोठ्या प्रमाणात गाळ साचत असल्याने सदर गाळ ड्रेनेज द्वारे काढणे शक्य होत नसून ड्रेनेज पाईपलाईन चोकअप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच फ्लॅश मिक्सरवरील गिअर बॉक्स नसल्याने तुरटीचे मिश्रण योग्य प्रकारे होत नसल्यामुळे तुरटीचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागत असल्याचे नमूद केलेले आहे.

सर्व बाबींचा विचार करता नमूद गिअरबॉक्स व इतर किरकोळ कामे तातडीने करणे आवश्यक असल्याकारणाने सदर काम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १५ वा वित्त आयोग निधी, न.प. निधी अथवा इतर उपलब्ध निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र १०:- न.प. मलकापूर पाणीपुरवठा विभाग करिता सन २०२४-२५ वर्षासाठी नमूद केलेल्या कामांकरिता मक्तेदारांची नेमणूक करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून पा.पु. अभियंता न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवाला मध्ये मलकापूर शहराला नियमित शुद्ध पाणी पुरवठा करण्याकरिता पा.पु. विभाग जलशुद्धीकरण केंद्र व संबंधित यंत्रणा सुस्थितीत व सुरळीत ठेवण्याकरिता सन २०२४-२०२५ वर्ष कालावधीसाठी प्रारूप उपाय योजना / कामे करणे गरजेचे असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे.

A) मलकापूर शहरास शुद्ध पाणी पुरवठ्या करिता लागणारे रॉ वॉटर हे मौजे धुपेश्वर येथील पूर्णा नदीतील हतनूर धरण मधील बँक वाटर मधून घेण्यात येते. हतनूर धरणात निरी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षण नुसार ५५% गाळ असून पावसाळ्यात पाण्याची गाळाचे प्रमाण (टरबिडीटी) १५००० ते ३०००० पी.पी.एम. एवढी असून पाणी शुद्धीकरण करण्यासाठी खालील प्रमाणे विविध रसायनांचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो जर सदर रसायनांचा वापर न केल्यास पाणी शुद्धी करणे शक्य होत नाही.

१) **ब्लिचिंग पावडर:-** पा.पु. विभागाचे जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असते या करिता प्रती टन अंदाजे तीन बॅग (२५ किलो) ब्लिचिंग पावडरची आवश्यकता असते. ब्लिचिंग पावडरच्या बॅग मध्ये प्रती बॅग मध्ये ३३ ते ३४ % क्लोरीन वायू उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रती वर्ष अंदाजे ११०० इतक्या ब्लिचिंग बॅग लागतील.

२) **तुरटी:-** पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये मोठ्याप्रमाणात गाळाचे प्रमाण असल्यामुळे पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्याकरिता मोठ्याप्रमाणात तुरटीचा वापर करावा लागतो. पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असते. धुपेश्वर येथून पंपिंगद्वारे येणारे पाणी हे दोन फौंटनद्वारे येत असल्यामुळे मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे २०० टन तुरटी लागत असून सदर तुरटी मध्ये १५ ते १६ % फेरीक ॲलम उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३) **PAC पावडर (POLY ALUMINIUM CHORIDE):-** पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये मोठ्याप्रमाणात गाळाचे प्रमाण असल्यामुळे पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्याकरिता मोठ्याप्रमाणात तुरटी सोबतच मोठ्याप्रमाणात PAC पावडरचा वापर करावा लागतो. पाण्यातील गाळाचे प्रमाण कमी करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असते. धुपेश्वर येथून पंपिंगद्वारे येणारे पाणी हे दोन फौंटनद्वारे येत असल्यामुळे मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे २० टन PAC पावडर लागत असून सदर PAC मध्ये १५ ते १६% फेरीक ALUM उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४) **POLY ELECTO FLOCCULANT जेली:-** जलशुद्धीकरण केंद्रावर ३ शिफ्ट मध्ये २४ तास पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरु असल्यामुळे तसेच मागील वर्षाचा सरासरी दैनंदिन अंदाजे प्रती वर्ष अंदाजे ६ टन POLY ELECTO FLOCCULANT जेली खरेदी करणे आवश्यक आहे.

५) **क्लोरीन टनर प्लॉटबाबत:-** नगरपालिका मलकापूर जलशुद्धीकरण केंद्रावर क्लोरीनेशन प्लॉट नसल्याने ब्लिचिंग पावडरचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागत आहे. ब्लिचिंग चा वापर जास्त प्रमाणात झाल्याने पिवर वॉटर संपवेलमध्ये व पाण्याच्या मोठ्या प्रमाणात ब्लिचिंगचे वेस्ट जमा होत आहे. जलशुद्धीकरण केंद्रावर क्लोरीन प्लॉट बसविल्यास पाण्याची गुणवत्ता सुधारेल व ब्लिचिंग खरेदीचे प्रमाणही कमी करता येईल. तरी क्लोरीन प्लॉट बसवण्यास व त्यास वार्षिक क्लोरीनटनर अंदाजे १५ सिलेंडर लागू शकतात.

६) **मनुष्यबळ पुरवठा करणे:-** पा. पु. विभाग जलशुद्धीकरण केंद्र चालविणे, पंपिंग स्टेशन कुशल / अकुशल कामगार कंत्राटी पद्धतीने लावणेबाबत. नगर परिषद मलकापूर पा पु विभाग अस्तित्वातील कर्मचारी यांच्या ७०% कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून जलशुद्धीकरण नगर पालिका मलकापूर कडे ४.८ दशलक्ष क्षमता, ४ दशलक्ष क्षमता, ३ जलशुद्धीकरण केंद्र असून सदर ठिकाणी पाणी शुद्धीकरण करण्यासाठी ब्लिचिंग पावडर, तुरटी , जेली, PAC चा वापर करणे तसेच पंप चालू बंद करणे, फिल्टर वॉश करणे या कामासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. तसेच मौजे धुपेश्वर पंपिंग स्टेशन येथे सुद्धा कर्मचारी आवश्यक आहे. तसेच इतर कामे लिकेज खोदकाम, हातपंप खोलणे/बसविणे, धुपेश्वर येथील पंप खोलणे/बसविणे, पाणी टंचाई मध्ये कामे करण्यासाठी कर्मचारी आवश्यक असून नवीन कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत न होण्याकरिता उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

B) **पा. पु विभाग विद्युत देखभाल दुरुस्ती करणे व साहित्य पुरविणे:-** पा.पु. विभागातील पंपिंग स्टेशन धुपेश्वर, नळगंगा जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्र येथे विविध क्षमतेचे CENTRIFUGAL पंप, व्हार्टीकल टर्बाईन पंप, मोटार, मडपंप, रोहित्र आहेत. सदर ठिकाणी मोटार जळणे, पंप जळणे, पंप नादुरुस्त होणे, विविध प्रकारच्या तांत्रिक समस्या निर्माण होत असतात. तसेच धुपेश्वर, जलशुद्धीकरण केंद्र व आवारातील लाईटिंग साहित्यासह दुरुस्ती करणे इत्यादी कामाकरिता वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

C) **पा.पु. विभाग मलकापूर ते धुपेश्वर पाईप लाईन, शहरातील वितरण व्यवस्था तसेच इतर किरकोळ कामे शासकीय दरसूची नुसार करणे.:-** मलकापूर ते धुपेश्वर ४०० मीमी व्यास PCCP RISING मेन असून शहरात ३ ते १५ इंची आकाराचे सिमेंट, लोखंडी, डी.आय.के पीव्हीसी पाईपची वितरण व्यवस्त असून विवध कारणांमुळे लिकेज होत असते व सदर लिकेज तात्काळ लिकेज दुरुस्तीची कामे करावी लागतात. तरी त्यासाठी वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

D) **पाणीपुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्थेवरील वॉल नवीन / दुरुस्ती करणे:-** मलकापूर शहराची पाणीपुरवठा व्यवस्था झोन पद्धतीने करण्यात येत असल्याने पाईपलाईनवरील वॉल वारंवार ऑपरेट करण्यात येतात. सदर वॉल वारंवार ऑपरेट केल्याने वॉलचे रॉड व चेकनट तसेच स्पिडंलचे कान तुटतात त्यांना वर्कशॉप

वरून वेल्डिंग करावे लागतात. यामुळे पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण होतात. सदर काम तत्काळ करणे आवश्यक आहे याकरिता वार्षिक मक्तेदार नेमणे आवश्यक आहे.

E) **विंधन विहिर व हातपंप साहित्य पुरवठा करणे व दुरुस्ती करणे:-** मलकापूर शहरात एकूण ८० हातपंप व विंधनविहिरी असून त्यांचा पर्यायी पाणी पुरवठा स्त्रोत म्हणून नागरिकांकडून नियमित वापर केला जात असतो. सदर हातपंप व विंधन विहीर दुरुस्ती बाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत असून वेळेवर दुरुस्ती न झाल्यास जनतेला पाणी समस्येस समोर जावे लागल्यास जनतेत रोष निर्माण होत असतो. तसेच न.प. कडे कर्मचारी संख्या नसल्याने सदर काम वार्षिक पद्धतीने करणे गरजेचे असून त्यासाठी वार्षिक मक्तेदाराची नेमणूक करणे.

F) **पा.पु. विभागात लागणारे किरकोळ साहित्य खरेदी करणे:-** पा.पु. विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत असल्यामुळे विविध प्रकारच्या तांत्रिक अडचणी येत असून बऱ्याचवेळी नवीन साहित्य खरेदी करावे लागते. तरी यापूर्वीचा अनुभव पाहता खालील प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे.

१)शुद्ध पाणी उपसणारे पंपाचे फुटबॉल मोल्डिंग पद्धतीने तयार करणे.

२)धुपेश्वर व जलशुद्धीकरण केंद्र, नळगंगा जॅकवेल वरील पंपाकरिता लागणारे सक्शन पाईप फेब्रिकेट करून तयार करणे

३)ब्लोअर दुरुस्ती करणे

४)विविध साईझचे केसिंग पाईप खरेदी करणे

५)पाईप लाईन दुरुस्तीसाठी खोदलेला रस्ता पॅचिंग करणे.

६)व्हॉल्व साठी नवीन चेंबर बांधणे.

७) पाणीपुरवठा विभागाचे धुपेश्वर, नळगंगा जॅकवेल तसेच जलशुद्धीकरण केंद्रावरील आवश्यक त्या क्लरीफायर वरील ब्रिजची कामे, बांधकाम व इतर किरकोळ दुरुस्त्या करणे.

सदर कामांकरिता वार्षिक मक्तेदारांची नेमणूक करणे.

G) **पा.पु. विभागातील शासकीय देयके दंडनीय रक्कम वगळून १५ वा वित्त आयोग निधीमधून अदा करणे:-** पा.पु. विभागातुन पंपिंग स्टेशन धुपेश्वर, नळगंगा स्टेशन वाकोडी पंपिंग स्टेशन जलशुद्धीकरण केंद्र (वाकोडी आणि मलकापूर) तसेच मौजे हतनूर येथील पाणी आरक्षण फी मौजे नळगंगा येथील पाणी आरक्षण फी, बारमाही भरावी लागते. सदर शासकीय देयकांचा भरणा १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत करणे गरजेचे आहे.

H) **धुपेश्वर पंपिंग स्टेशन जलशुद्धीकरण केंद्रावरील रोहित्र नादुरुस्त झाल्यास भाड्याने घेणे:-** धुपेश्वर पंपिंग स्टेशन जलशुद्धीकरण केंद्रावरील असलेले विद्युत रोहित्र एखादे वेळी महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाकडून अतिरिक्त विद्युत दाब वाढविल्याने किंवा तांत्रिक बाबींमुळे नादुरुस्त झाल्यास किंवा जाळल्यास तसेच मलकापूर न.प. पा.पु विभागाकडे अतिरिक्त रोहित्र नसल्यामुळे पाणी पुरवठा पूर्णतः बंद ठेवावा लागतो व त्याचा परिणाम मलकापूर शहराच्या पाणी पुरवठ्यावर होतो. सदर परिस्थिती टाळण्यासाठी न.प. मालकीचे रोहित्र दुरुस्त होई पर्यंत भाडे तत्वावर घेऊन शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवता येईल.

**I) धुपेश्वर येथील कर्मचर्यांना प्रवास भाडे देणेबाबत:-** मलकापूर शहराच्या पा.पु.विभागाची हेडवर्क साईड मलकापूर शहरापासून १५ किमी अंतरावर असल्याने कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र परिवहन महामंडळाचे बसने वारंवार जावे यावे लागते. याकरिता लागणारे प्रवास भाडे (फक्त) हे सदर कर्मचाऱ्यांना मिळणेबाबत

**J) धुपेश्वर येथील पंपिंग स्टेशनला रॉ वॉटर मीटर बसवणे बाबत:-** मलकापूर शहरास शुद्ध पाणी पुरवठ्याकरिता लागणारे रॉ-वॉटर हे मौजे धुपेश्वर येथील पूर्णा नदीतील हातनुर धरण मधील बँक वॉटर मधून घेण्यात येते. हतनूर धरणात निरी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार ५५% गाळ असून पावसाळ्यात पाण्याच्या गाळाचे प्रमाण (टरबिडीटी) १५००० ते ३०००० पी.पी.एम एवढी असून सदर ठिकाणी रॉ-वॉटर उचल किती करण्यात आली याचे मोजमाप करण्याकरिता वॉटर मीटर बसवणे आवश्यक आहे. धुपेश्वर येथे रॉ-वॉटर मीटर नसल्याने दंडणीय पद्धतीने संबंधित विभागाकडून पाणी कर आकारणी करण्यात येत आहे. यामुळे नगरपरिषदेस आर्थिक भुर्दंड भरावा लागत आहे सदर ठिकाणी वॉटर मीटर बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील प्रमाणे A ते J कामे वारंवार करावी लागत असल्याने वार्षिक दरपत्रक मागविण्यास व सदर कामांचे देयक १५ वित्त आयोग / बंधनकारक अनुदान किंवा न.प. निधी तून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**